विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूह, पुणे
व भारत अस्मिता फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे
"राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड" राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

# सत्प्रवृत्तींच्या सन्मानाने समाजाला दिशा मिळते

## गिरीश बापट यांचे प्रतिपादन;

## 'राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय पुरस्कारां'चे वितरण

लातूर,दि. ८ : ''सामाजिक जाणिवेतून काम करणाऱ्या अनेक सत्प्रवृत्ती समाजामध्ये आहेत. आपल्याला मिळत असलेल्या धनाचा विनियोग दुसऱ्याचे जीवन सुखी होण्यासाठी ही माणसे अहोरात्र कष्ट उपसत असतात. अशा सत्प्रवृत्तींच्या सन्मानाने समाजाला दिशा मिळते. अशा व्यक्तींचा आदर्श घेऊन इतर अनेकजण तसे कार्य उभारतात," असे प्रतिपादन राज्याचे संसदीय कार्य, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूह, पुणे व भारत अस्मिता फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या 'राष्ट्रधर्मपूजक दादाराव कराड राज्यस्तरीय पुरस्कारां'चे वितरण गिरीश बापट यांच्या हस्ते लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय येथे झाले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. पुरस्काराचे हे सातवे वर्ष आहे. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूह, पुणेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ.विश्वनाथ दा. कराड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी लातूर येथील माजी खासदार गोपाळराव पाटील, स्वामी विवेकानंद हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अशोक कुकडे, माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे उपाध्यक्ष प्रा. राहुल विश्वनाथ कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण, माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे सचिव व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक रमेशअप्पा कराड, तुळशीराम कराड, काशीराम कराड व एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सरिता मंत्री, प्रा. गौतम बापट आदी मान्यवर उपस्थित होते.

नाशिक येथील संजय पडोळ (कृषीरत्न), बीडमधील गेवराई तालुक्यातील प्रीती व संतोष गर्जे (समाजरत्न), पुणे येथील डॉ. शशिकांत चव्हाण (आरोग्यरत्न), हरंगुळ, लातूर येथील प्रकाश रायचूरकर (शिक्षणरत्न), लातूरमधील भादा येथील पांडुरंग कात्रे (ग्रामरत्न), चाकूर तालुक्यातील वडवळ येथील श्रीमती मायाताई सोरटे (बचतगटरत्न), नागपूर येथील एबीपी माझाच्या ब्युरो चीफ सरिता कौशिक (जनजागरणरत्न), बुलढाणा येथील श्री श्री श्रीहरी चैतन्य महाराज (अध्यात्मरत्न) याना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. श्रीहरी चैतन्य महाराजांच्या वतीने त्यांचे सचिव अशोक कापसे यांनी पुरस्कार स्वीकारला. शाल, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, संतश्री ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा व प्रत्येकी रू. ११,०००/- रोख, असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

गिरीश बापट म्हणाले, ‘‘समाजाकडून मिळालेला पैसा समाजाच्या हितासाठी वापरणे हेच खरे जीवन आहे. त्याचा विनियोग समाजातील गरीब व सामान्यांच्या विकासासाठी झाला पाहिजे. केवळ शरीर, संपत्तीने मोठे होऊन चालत नाही. मनाने आणि व्यापक दृष्टीनेही मोठे होणे आवश्यक असते. कराड कुटुंबीयांचे जीवन याच उद्दिष्टावर असल्याने त्यांच्याकडे सरस्वती आणि लक्ष्मीचा वास आहे. समाजातील अशा माणसांसाठी जगणाऱ्या, वेगवेगळ्या क्षेत्रातून समाजासाठी योगदान देणाऱ्या संवेदनशील आणि नैतिक व्यक्तिमत्त्वांचा गौरव करून इतरांना चांगल्या कामासाठी प्रवृत्त करण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद आहे." अशा सत्प्रवृत्तीचा गौरव करताना आम्ही राजकीय व्यक्तींनीही त्यांच्याकडून सामाजिक बांधिलकीची जोपासना करायला शिकले पाहिजे, असेही गिरीश बापट यांनी नमूद केले.

डॉ. अशोक कुकडे म्हणाले, "समाजातील वलय नसलेल्या आणि तळागाळातील लोकांसाठी काम करण्याऱ्या या असामान्य माणसांचा सत्कार करून त्यांचे कार्य समाजासमोर आणण्याचा हा प्रयत्न स्पृहनीय आहे. कृषी, शिक्षण, आरोग्य, अध्यात्म आदी क्षेत्रात कार्य करणाऱ्या लोकांचा आदर्श समाजाला प्रेरित करेल. कराड कुटुंबीयांचा हा वेगळेपणा समाजाला दिशा देणारा आहे."

प्रा. डॉ. विश्वनाथ द. कराड म्हणाले, "समाजासाठी झटणाऱ्या आपल्यासारख्या व्यक्तींचा गौरव करताना संस्थेचाही सन्मान वाढत आहे. देशाचे भवितव्य भावी पिढीच्या हातात आहे. एकोणिसावे शतक भारतीयांचे असून, स्वामी विवेकानंदाचे स्वप्न सत्यात उतरवायचे असेल, तर अशा प्रकारच्या सामाजिक कार्यात पुढाकार घेणे गरजेचे आहे."

पुरस्काराला उत्तर देताना संजय पडोळ म्हणाले, "हा सर्व शेतकऱ्यांचा सत्कार आहे. आज शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय आहे. त्यातूनही काही लोक मार्ग काढीत आहेत. त्यामुळे एमआयटीने शेती संशोधनात पुढाकार घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करावे." सरिता कौशिक आणि डॉ. शशिकांत चव्हाण यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रा. राहुल विश्वनाथ कराड यांनी पुरस्कारांमागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. सरिता मंत्री यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. मंगेश तु. कराड यांनी आभार मानले.